अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २६ जुलै २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २९७ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


## यंदा राज्यातील साखर उत्पादन घटण्याची भीती



✔ **मुंबई :** राज्यात आणि देशात अनेक भागात जोरदार पाऊस होत आहे अनेक ठिकाणी तर पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, साखर उत्पादन करणाऱ्या क्षेत्रात समाधानकारक पाऊस होत नसल्याने त्याचा परिणाम साखर उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. त्याच्या परिणामी शेतकरी आणि साखर कारखान्याचे आर्थिक गणित तर बिघडणार आहेच सोबतच साखरेच्या दरावरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सध्या राज्यात आणि देशात सर्वदूर पाऊस पडत आहे. मात्र, साखर कारखानदारी पट्ट्यात अद्यापही दमदार पावसाची प्रतिक्षा आहे. ऊस हे पिक प्रामुख्याने मुबलक पाण्यावर अवलंबून असल्याने आणि पावसाळ्यात मशागतीसोबतच खतांच्या मात्रेसोबत पाण्याची गरज असतांना लांबलेला पावसाचा फटका नवीन ऊस लागवडीसोबतच ऊस आणि पर्यायाने साखर उत्पादनाला बसणार आहे. यामुळे यंदा राज्यात साखरचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा वगळता ऊस साखर कारखानदारी असणाऱ्या अहमदनगर, नाशिक, पुणे या जिल्ह्यासह सोलापूर जिल्ह्यातील काही भागात पावसाचे प्रमाण कमी आहे. नेमका हाच पट्टा साखर कारखानदारीशी निगडीत आहे. एकट्या अहमदनगर जिल्ह्याचा विचार केला तर गेल्यावर्षी ३५ हजार हेक्टरवर आडसाली ऊसाची लागवड झाली होती. यंदा मात्र केवळ ११९११ हेक्टरवरच ऊसाची लागवड झाली असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी सांगितले आहे.

# कंत्राटी भरतीवरून 'गोंधळात गोंधळ'

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्याच्या सत्तेतील महायुतीत मंगळवारी शह देण्याचा उद्योग झाला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'डबल गेम' केली. शासनाच्या विविध खात्यांमध्ये कंत्राटी पद्धतीने भरती करण्याच्या हालचाली सुरू झालेल्या असतानाच फडणवीसांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र धाडून ही भरती रद्द करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे या निर्णयाला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. दरम्यान फडणवीसांनी एकीकडे कॉन्ट्रॅक्ट सिस्टिम भरतीला रोख लावला तर दुसरीकडे आपल्या गृह खात्यात मात्र पोलिसांची नेमणूक कंत्राटी तत्त्वावर करण्याचा निर्णय सोयीचा नियम लावून घेतला. एकूणच भरती प्रक्रियेवरून सरकारमध्ये 'गोंधळात गोंधळ' अशी स्थिती निर्माण झाली आहे.**

- फडणवीसांची 'डबल गेम', शासन भरतीला लावला 'लगाम'
- स्वतःच्या खात्यासाठी मात्र घेतला सोयीचा 'नियम'

मुंबई पोलीस दलात तीन हजार कंत्राटी पोलिसांची नेमणूक केली जाणार आहे. मात्र, सरकारच्या या निर्णयाला आता विरोध होत आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कंत्राटी पोलीस नेमणुकीला कडाडून विरोध केला.या निर्णयातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त करत २८९ अन्वये कंत्राटी पद्धतीने पोलीस नेमणुकीला दानवे यांनी विधानपरिषदेच्या सभागृहात प्रखर विरोध दर्शविला.

एकीकडे केंद्र सरकार २ कोटी रोजगार देण्याची घोषणा करते तर दुसरीकडे ९ खासगी संस्थांना वेगवेगळ्या पद्धतीने रोजगार देण्यासाठी नेमणूक सरकारने केली आहे. पोलीस हे सरकारी अखत्यारीतच असले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. गृहखात्याच्या २१ जानेवारी २०२१च्या निर्णयानुसार बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयासाठी पोलीस शिपाई संवर्गातील ७०७६ तर पोलीस चालक संवर्गातील ९९४ पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली आहे.प्रत्यक्षात भरती प्रक्रिया सुरू असलेली ७०७६ पदे वगळल्यानंतरही ३ हजार पदे रिक्त राहात आहेत, असे पोलीस आयुक्तालयाचा अभिप्राय आहे.

## ▪ मुंबईत कंत्राटी पोलिसांची नेमणूक, निर्णयाला होतोय विरोध





बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक म्हणजे ही कंत्राटी पद्धतच होय. हा निर्णय चुकीचा आहे. शासनाने पोलिसांची भरतीच केली पाहिजे. भरतीमधील उमेदवारांचे प्रशिक्षण अत्यंत टफ असते. त्यांना कायद्याचे ज्ञान दिले जाते. खाजगी संस्थेतून येणाऱ्यांना कायद्याचे ज्ञान असते का? त्यांच्याकडून काही चुका झाल्यातर जबाबदारी कोणावर? त्यांना अधिकार काय? भरतीमधून आलेल्या पोलिसांवर रिप्सॉन्सिबिलिटी असते. जर खाजगी लोक पोलीस म्हणून येत असतील तर पोलीस आणि होमगार्ड यांच्यात फरक काय? अशामुळे खात्यात दुजाभाव निर्माण होईल.

**- दीपक जतकर**
निवृत्त पोलीस अधिकारी, सोलापूर

### यामुळे कंत्राटी पोलीस भरती?

मुंबई पोलीस दलात नेहमी मनुष्यबळाची टंचाई असते. देशाची आर्थिक आणि महाराष्ट्र राज्याची राजधानी असलेल्या मुंबईत पोलिसांची वेगवेगळ्या कारणासाठी गरज भासत असते. त्यामुळे मुंबई पोलीस दलात पोलिसांची नेमणूक करण्याची विनंती पोलीस आयुक्तांनी गृहविभागाकडे केली होती. दरम्यान या पार्श्वभूमीवर पोलिसांची कंत्राटी पदभरतीसाठी गृहखात्याने निर्णय घेतला. ज्यात मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई ते पोलीस सहाय्यक निरीक्षकांची ४० हजार ६२३ पदे मंजूर केली आहेत. त्यापैकी १० हजार पोलीस शिपाई संवर्गातील पदे रिक्त आहेत.उपलब्ध मनुष्यबळ दैनंदिन कर्तव्यासाठी अपुरे पडत आहे. तसेच मुंबई, ठाणे आणि उपनगरांच्या भागात दहीहंडी, गणेशोत्सव सारख्या महत्वाच्या सणांच्या काळात बंदोबस्तासाठी पोलिसांची मोठी आवश्यकता असते. त्यामुळे बाह्य यंत्रणेतील मनुष्यबळ देण्याची विनंती पोलीस आयुक्तालयाने गृहखात्याकडे केली होती.त्यानुसार राज्य सुरक्षा महामंडळामार्फत कंत्राटी पद्धतीने जास्तीतजास्त ११ महिन्यांसाठी तीन हजार पोलिसांची नेमणूक केली जाणार आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच निर्णय आहे.



### शासकीय खात्यातील कंत्राटी पद्धतीला ब्रेक

राज्यात कंत्राटी तत्त्वावर शासकीय कर्मचाऱ्यांची भरती करण्याच्या निर्णयाला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. यासंदर्भात राज्य सरकारकडून १४ मार्च रोजी अधिसूचना काढण्यात आली होती. मात्र, आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून हा निर्णय रद्द करण्यासंदर्भात विनंती करण्यात आली आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी खासगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, राज्य शासनाच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आलेल्या वेतनाच्या दरात त्रुटी असल्याचा मुद्दा उपस्थित करत फडणवीस यांनी हा निर्णयच रद्द करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे राज्यात कंत्राटी तत्त्वावर शासकीय कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या निर्णयाला ब्रेक लागणार आहे. अधिवेशनाच्या तोंडावर विरोधकांची ओरड नको म्हणून त्यांनी ही खेळी केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### जीआरमध्ये काय म्हटले होते?

प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासाच्या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याचे दृष्टीने शक्य असेल तिथे बाह्ययंत्रणेमार्फत कामे करून घेण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे वित्त विभागाच्या मान्यतेने या विभागाच्या दिनांक १८जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. ब्रिस्क फॅसिलिटिज प्रा.लि. व क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस प्रा. लि. या दोन निविदाकाराच्या पॅनलला तीन वर्षाच्या कालावधीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या पॅनलवरील एजन्सींची सेवा शासनाच्या अन्य विभागास घेण्यास मुभा देण्यात आली होती. संबंधित शासन निर्णयानुसार सदर निविदा प्रक्रियेमध्ये एकूण २६ निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यापैकी निविदा समितीने १० निविदाकारांना पात्र ठरविले होते.

## मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या वृद्ध महिलेला दुचाकीने उडवले

### महिला जागीच ठार; दुचाकीस्वार गंभीर जखमी

✔ सुराज्य/पंढरपूर



सकाळी मॉर्निंग वॉकला जात असणाऱ्या एका महिलेला भरधाव वेगात येणाऱ्या दुचाकीची धडक बसल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे तर यातील दुचाकी स्वार हा देखील गंभीर असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. गतिरोधक काढल्यामुळे बेभान होऊन भरधाव वेगाने वाहने चालवत असल्यामुळे हा अपघात झाला. यामध्ये महिलेचा नाहक जीव गेला आहे.

पंढरपुरातील टाकळी रोड परिसरातून मॉर्निंग वॉकला जात असताना सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास रजनी अनिल गुंडेवार वय ७१ या टाकळी रोड येथील गणेश शटर या दुकानासमोरून जात असताना भरधाव दुचाकी स्वराने निष्काळजीपणाने दुचाकी चालवून रजनी गुंडेवार यांना जोराची धडक दिल्यामुळे रजनी गुंडेवार यांचा जागीच मृत्यू झाला. टाकळी रोडवर नगरपालिकेने गतिरोधक बसवले होते. मात्र टाकळी रोडवरील सर्व गतिरोधक काढून टाकले आहेत. त्यामुळे वाहने ही अतिशय वेगाने जात आहेत. यापूर्वी देखील या ठिकाणी अनेक अपघात झाले आहेत. त्यामुळे माजी नगरसेवक आदित्य फत्तेपुरकर यांनी पाठपुरावा करून गतिरोधक बसवले होते.

### राजकारणातून गतिरोधक काढले

गेल्या सहा महिन्यांपूर्वी पाठपुरावा करून टाकी रोड वर गतिरोधक बसवले होते. मात्र राजकीय दृष्ट्या प्रेरित होऊन काही समाज कंठकांनी गतिरोधक काढण्याची मागणी केली होती गतिरोधक काढल्यापासून सोनसाखळी चोरीच्या घटना घडत आहेत. तसेच या ठिकाणी अनेक अपघात देखील झाले आहेत. आज झालेल्या अपघाताची जबाबदारी गतिरोधक काढणाऱ्यांनी घ्यावी. तसेच त्यांच्यावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर यांनी केली आहे.

## अकलूजमध्ये ट्रकने चिरडल्याने सायकलस्वर ठार

✔ सुराज्य/अकलूज



येथील प्रतापसिंह चौकात एका सायकलस्वारास ट्रकने चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

याबाबत पोलिसांना दिलेली माहिती अशी की,शिवतेजनगर, देशमुखमळा, यशवंतनगर (ता. माळशिरस जि. सोलापूर) येथील रहिवाशी असलेले पोपट दाजी एकतपुरे ५५वर्षे हे प्रतापसिंह चौकातून जात असताना पाठीमागून येणारा ट्रक क्र.एम. एच. १६ / सीसी ६०४८ याने सकाळी ११.३० चे वाजण्याचे सुमारास पोपट यांना जोरदार धडक दिली. त्यामुळे पोपट यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

हा अपघात इतका भयानक होता की ट्रकचे चाक सदर व्यक्तीच्या डोक्यावरून गेल्याने अक्षरशः डोके व चेहरा पूर्णपणे विद्रूप झाले होते.

मयत व्यक्तीचा भाऊ रामचंद्र दाजी एकतपुरे (वय ४२ वर्ष व्यवसाय सेन्ट्रींग रा. शिवतेजनगर, देशमुखमळा, यशवंतनगर ता. माळशिरस) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ट्रक चालक अनिकेत अंकुश कवडे (रा. कोळवडी ता. कर्जत जि. अहमदनगर) याच्याविरुद्ध अकलूज पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पो.ह.शेख करीत आहेत.

## पुणे, सातारा, कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोटाची चाचणी!

▶ दहशतवाद्यांचा देशविघातक कृत्याचा होता इरादा

✔ सुराज्य/पुणे

कोथरूड पोलिसांनी नाकाबंदीत पकडलेल्या दोन दहशतवाद्यांनी पुणे, सातारा, कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोटाची चाचणी केल्याचे दहशतवाद विरोधी पथकाने न्यायालयात सादर केलेल्या अहवालातून समोर आले आहे.

दोघेही इसिसच्या अल सुफा संघटनेशी संबंधित असल्याचे उघडकीस आले असून, घातपातासाठी दहशतवादी विचारधारा स्वीकारण्यापासून प्रशिक्षण आणि त्यानंतर प्रत्यक्षात कारवाई करेपर्यंतच्या सर्व पद्धती दोघांनी आत्मसात केल्या होत्या. या आरोपींवर दाखल गुन्ह्यात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यान्वये कलम वाढवण्यात आले आहे.

दोन्ही दहशतवाद्यांची पोलिस कोठडीसंपतअसल्यानेदहशतवाद विरोधी पथकाने दोघांना जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले. त्यावेळी सत्र न्यायाधीश एस. व्ही. कचरे यांच्या न्यायालयाने त्यांना ५ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. दहशतवाद विरोधी पथकाने तपासादरम्यान दोन्ही आरोपींच्या घराची झडती घेतली. त्यामध्ये विविध वस्तू आढळून आल्या. त्यात इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह पांढरी पावडर सापडली होती. ती पावडर स्फोटके असल्याचे एक्स्प्लोसिव्ह वेफर डिटेक्टरमध्ये स्पष्ट झाले आहे.

### सोलापूर जिल्ह्यासाठी गूड न्यूज

## उजनी लवकरच प्लसमध्ये; धरण क्षेत्रात जोरदार पाऊस

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूरसह जिल्ह्यासाठी मंगळवारी एक गुड न्यूज मिळाली.सोलापूरची वरदायिनी असलेल्या उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पर्जन्यवृष्टी सुरू आहे.

या धरणाच्या वरती असलेल्या पुणे जिल्ह्यातील धरणे १०० टक्के भरण्याच्या स्थितीत आहेत.त्यातच खडकवासला धरणातून मंगळवारी सायंकाळपासून एक हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे.भीमाशंकराच्या डोंगरातही संततधार सुरू आहे. हे सारे पाणी उजनीत येऊन थडकणार आहे. त्यामुळे उजनी लवकरच प्लसमध्ये येणार आहे. आणखी एक आनंदाची बाब म्हणजे उजनी धरणाकडे येणारा दौंडमधून येणारा विसर्ग २५,८२७ हजार क्युसेक इतका झाला आहे.

हाच वेग राहिला तर येत्या आठवडाभरामध्ये उजनी धरण वजावट संपून अधिककडे जाईल. शिवाय पुणे जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने खडकवासला धरण १०० टक्के भरले आहे. पुणे जिल्ह्यातील धरणाचे पाणी उजनीकडे येण्यास सुरुवात झाली आहे.

### सोलापूरवरही कृपा

सोलापूर आणि परिसरातील तालुक्यांमध्ये सोमवारी रात्रीपासून मंगळवारी दुपारपर्यंत रिमझिम पाऊस सुरू होता.दिवसभरात सूर्यदर्शन झाले नाही. सर्वच तालुक्यांमध्ये पावसाळी हवामान असून भिज पाऊस सुरू झाल्याचे सांगण्यात आले. सकाळी ८.३० वाजता संपलेल्या २४ तासात सोलापुरात २४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.





## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मला माहितेय, तुम्हाला इतक्या पावसाची सवय नाहिये !!


कल्याण
379-92-237

मेन बाजार
270-94-266


# सोलापूरचा पाणीप्रश्न आ.प्रणिती शिंदे यांनी मांडला अधिवेशनात

## पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आयुक्तांना सूचना देऊ : मुख्यमंत्री

✔ सुराज्य/सोलापूर



विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत आ. प्रणिती शिंदे यांनी आज मंगळवारी सोलापूर शहरातील विस्कळीत पाणीपुरवठ्याकडे लक्ष वेधत अवेळी येणारे पाणी भरताना तिघांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याचे सांगून आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी महापालिकेचा भोंगळ कारभार सुरू असून निवडणूक नसल्याने पालिकेत नगरसेवक नाहीत. त्यामुळे प्रशासन मनमानीपणा करीत असल्याचा आरोप केला. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महापालिकेने पाणीपुरवठ्याबाबत योग्य नियोजन करावे, असे आदेश देऊन पाण्यामुळे मृत्यूमुखी पडलेल्या तिघांच्या वारसदारांना शासनातर्फे मदत केली जाईल, असे सांगितले.

सोलापूरच्या पाणीपुरवठ्याबाबत आ. प्रणिती शिंदे आक्रमक होत म्हणाल्या, महानगरपालिकेमध्ये अतिशय डिसाळ पद्धतीचा कारभार सुरू आहे. यामुळे शहराचा पाणी पुरवठा अतिशय विस्कळीत झाला आहे. उजनी धरण मायनस २२ मध्ये आहे. पण लवकरच त्या भागात पाऊस पडत आहे. यामुळे पुढील आठवड्यात कदाचित उजनी प्लसमध्ये येईल. महानगरपालिकेमध्ये काँग्रेसची सरकार असताना सक्षम पंप लावून शहरामध्ये एक दिवसाआड पाणी पुरवठा आम्ही करीत होतो. आजतागायत सोलापूर शहरामध्ये सहा ते आठ दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. महानगरपालिका सोलापूर शहराच्या पाणी पुरवठ्या बाबत नियोजन करण्यास तयार नाही. हा जो ६ दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. तो देखील अवेळी, विस्कळीत, कधी रात्री २ वाजता, पहाटे ४ वाजता होत आहे. गेल्या चार महिन्यात पाणी भरत असताना तीन मुलांचा मृत्यू झाला. रोहित फटफटवाले या २४ वर्षाच्या मुलाचा मोटार चालू करीत असताना मृत्यू झाला. तसेच मुलगा शांतराज तल्लारे या आठ वर्षाच्या मुलाचा देखील मोटार लावताना विजेचा धक्का लागून मृत्यू झाला, असल्याचे आ. शिंदे यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. सोलापूर शहरामध्ये जो विस्कळीत पाणी पुरवठा होत आहे. यामध्ये लक्ष देऊन हा पाणीपुरवठा शहराला किमान दोन दिवसाआड देण्याचे नियोजन करावे, अशी मागणी सभागृहात केली.

### मृतांच्या वारसदारांना मदत मिळेल : मुख्यमंत्री

आ. प्रणिती शिंदे यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, सोलापूर शहरातील विस्कळीत पाणी पुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात आयुक्तांना तातडीने सूचना देण्यात येईल तसेच विजेचा धक्का लागून अपघाती निधन झालेल्या तिन्ही व्यक्तींच्या कुटुंबाला लवकरात लवकर शासनातर्फे आर्थिक मदत देण्यात येईल.

### मनपाच्या निवडणुका लवकर घ्या : आ. शिंदे

गेली दीड वर्षे झाली तरीही सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक लागलेली नाही. महापालिकेत नगरसवेकच नसल्यामुळे कोणीही वाली नाही. मनपा प्रशासकांचा मनमानी कारभार सुरु आहे. लवकरात लवकर जर आपण निवडणूक घेतली तर प्रशासनावर वचक बसेल, अशी मागणी आ. प्रणिती शिंदे यांनी केली.